पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८,

लेखा विभाग

---

वाचले:- दि.२८/०९/२०२० रोजीचा सभावृतांत

क्र.लेखा/०६//कावि/१७७/२०२० दिनांक :- ०७/१०/२०२०

परिपत्रक

विषय:- सन २०२०-२१ व २०२१-२२ चे अंदाजपत्रकावर कार्यवाहीबाबत.

सन २०२०-२१ चे व २०२१-२२ चे अंदाजपत्रकावर होणारी जमा व खर्च यावर चर्चा करणेकामी दि.२८/०९/२०२० रोजी बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत सन २०२०-२१ चे व सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकबाबत चर्चा होऊन खालील मुद्दांबाबत कार्यवाही करणेचे निश्चित करण्यात आले आहे.

१) सन २०२०-२१ ची जमा रक्कम मागील वर्षाच्या तुलनेत साधारण २० ते २५ % इतकी कमीने जमा होणार आहे. सबब त्याच प्रमाणामध्ये अंदाजपत्रकामध्ये बदल करावे लागणार असुन विकास कामासाठी कमी रक्कमा उपलब्ध होण्याची शक्यता आहे. सदर जमा रकमेचा विचार करता व सद्यस्थितीत दायित्वाचे प्रमाण जास्त असल्या कारणाने ज्या कामांचे दायित्व पुढील आर्थिक वर्षासाठी निर्माण होणार नाही अशाच प्रकारची कामे विभागांनी हाती घेण्यात यावीत.

२) उपरोक्त जमा होणा-या रककमांचा विचार करता फक्त अत्यावश्यक कामे काढावीत जेणे करून पुढील दायित्वाची रक्कम जास्त वाढणार नाही.

३)' सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात केलेल्या तरतूदीच्या जास्तीत जास्त दीडपट मर्यादेने नवीन कामे काढावीत.

उपरोक्त प्रमाणे सर्व संबंधित विभागांनी कार्यवाही करणेत यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८

प्रत:-

१) स्थापत्य विभाग
२) विद्युत विभाग
३) पाणीपुरवठा व जलनि:सारण विभाग
४) पर्यावरण अभियांत्रिकी विभाग